## जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची दिनांक ३०/०६/२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री.विक्रमकुमार जिल्हाधिकारी , औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक दिनांक ३०/०६/२०१४ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता घेण्यात आली. सदर बैठकीस खालील प्रमाणे समितीचे सदस्य व अधिकारी उपस्थितीत होते.

| अ.क्र | सदस्यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. श्री.विक्रमकुमार जिल्हाधिकारी औरंगाबाद | अध्यक्ष,जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद |
| २ | मा.श्री.अघाव पोलीस निरिक्षक सहय्यक पोलीस आयुक्त,औरंगाबाद ( शहर ) | सदस्य,जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |
| ३ | मा.श्री.के.के.पाटील पोलीस निरिक्षक (ग्रामीण) औरंगबाद (प्रतिनिधी) | सदस्य,जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |
| ४ | पोलीस उपअधिक्षक (नाहसं) औरंगाबाद (प्रतिनिधी) | सदस्य,जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |
| ५ | मा.श्री.विनोद कोटेचा आति.जिल्हा सरकारी वकील औरंगाबाद (प्रतिनिधी) | सदस्य,जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |
| ६ | मा.श्री.शरद महादु जाधव, रा.मथुरानगर, सिडको, औबाद | अशासकीय सदस्य, जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |
| ७ | मा.श्री.भास्कर नाडे रा.औरंगाबाद | अशासकीय सदस्य, जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |
| ८ | शेख जे.एस.एम. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,औरंगाबाद . | सदस्य सचिव,जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, औरंगाबाद. |

सभेच्या सूरुवातीस उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत सदस्य सचिव यांनी केले. तद्नंतर सभेस सुरुवात झाली.

**विषय क्रमांक.१ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

दिनांक २६/०५/२०१४ रोजी संपन्न झलेल्या बैठकीचे इतिवृत्ताचे वाचन करण्यांत आले व ते सर्वानुमते मान्य करण्यांत आले.

**विषय क्रमांकः-२ अनुसूचित जाती,जमाती अधिनियम,१९८९ अंतर्गत नोंद झालेल्या गुन्हयांची माहिती व पोलीस विभागाकडून प्राप्त गुन्हयांचा आढावा.**

दि.०१.०२.२०१४ ते. २६.०६.२०१४ पर्यंत घडलेल्या गुन्हयांची माहिती पोलीस विभागाने सादर केली. पोलीस आयुक्त (शहर),औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रात ०९ गुन्हे दाखल झाल्यापैकी ०२ गुन्हा पोलीस तपासावर आहे, तर पोलीस अधिक्षक (ग्रामीण), औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रात २० गुन्हे दाखल झाल्यापैकी १६ गुन्हे पोलीस तपासावर व १ पोलीस फायनल झाला आहे असे एकूण २९ गुन्हे घडलेले आहेत. पोलीस आयुक्त, शहर यांच्या कार्यक्षेत्रातील ०२ तर पोलीस अधिक्षक ग्रामीण यांच्याकडील १६ प्रकरणे असे एकुण १८ प्रकरणे पोलीस तपासावर प्रलंबित आहे. सन २००७-०८ मधील हायकोर्ट स्टे-३, व सन २००९-१० मधील १ असे एकुण हायकोर्ट स्टे ४ .

**विषय क्रमांकः-३ आयत्या वेळेचे विषय :-**

१. मा.अध्यक्ष यांनीअत्याचाराचे बळी ठरणऱ्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या व्यक्तीना नवीन अत्याचार प्रतिबंधक नियमान्वये देण्यात येणाऱ्या वाढीव नुकासान भरपाई देण्याबाबत विचारले असता सदस्य सचिव यांनी सांगीतले की १२८ अत्याचारीत व्यक्तीना नुकासन भरपाई देण्यात आलेली आहे त्या पैकी २५ अत्याचारीत व्यक्तीने धनादेश देण्यात आले. त्यावर मा. अध्यक्ष यांनी उर्वरीत धनादेश त्वरीत वाटप करण्यात यावे असे आदेशीत केले.

//२//

२. मा.अशासकीय सदस्या यांनी बैठकी मध्ये सरकारी वकील गैरहजर राहतात असे संगीतले असता मा.अध्यक्ष यांनी सरकारी वकीलांना पत्र देऊन वेळेवर हजर राहण्याबाबत कळविण्याचे सुचित केले.

३. मा.अध्यक्ष यांनी न्यायालयात प्रलंबित प्रकरण अभ्यास करणे असा उदेश ठेवुन खाजगी वकील नेमणुकी बाबत सदस्य सचिव यांना विचारले असता सदस्य सचिव यांनी वृत्तपत्रात जाहिरात दिली होती परंतु प्रतीसाद मिळाला नाही असे सांगीतले यावर मा.अध्यक्ष यांनी अशासकीय सदस्यानी सुचवलेले वकील यांना सदर कामासाठी नियुक्त करणे बाबत सुचित केले.

४. मा.अध्यक्ष यांनी चावडी वाचन करुन अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमाची प्रसिध्दी करण्यासाठी कार्यक्रम घेण्याबाबत गट विकास अधिकारी यांना पत्र देण्याविषयी सुचित केले.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिलीफ फंड योजनेचा लाभ भेटावा या उद्देशाने जे चार्जशिट मराठी असतील त्यांचे इंग्रजी अथवा हिंदी भाषेमध्ये भांषातर करुन देण्याविषयी मा.पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक ग्रामीण यांना अर्धशासकीय पत्र देवुन कळविण्याविषयी सुचीत करण्यात आले.

६. मा.अध्यक्ष यांनी बैठकी मध्ये अनुउपस्थीत शासकीय सदस्यांकडुन विचारणा करण्यासाठी सुचित केले.

७. अशासकीय सदस्य यांनी फिर्यादी सोबत असलेल्या साक्षीदारांना मिळणाऱ्या प्रवास भत्या दिला नाही असे कळविले असता सदस्य सचिव यांनी या बाबत अद्यापर्यंत प्रवास भत्या मागणी/प्रस्ताव या कार्यालयात आलेले नाही मागणी आल्यास तत्काळ कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले या वर अशासकीय सदस्य यांनी या बाबत फिर्यादीनां माहिती देण्यात यावी किंवा बॅनर व फलकाद्वारे प्रसिदधी करण्यात यावी असे सांगीतले व मा.अध्यक्ष यांनी याबाबत सर्व पोलीस स्टेशन यांना बॅनर देण्या बाबत सदस्य सचिव यांना सागीतले असता, निधी उपलब्ध नसल्यामुळे सदरील प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल असे सचीवांनी सांगीतले.

८. जिल्हा दक्षता समितीच्या बैठकीचे इतिवृत्तात दरमहा जिल्हयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याचे ठरले.

९. अत्याचार ग्रस्त कुटुंबाना रमाई आवास योजने मध्ये घरकुल मंजुर करण्यात आले आहे. पैकी काही व्यक्तीने मंजुर निधी मध्ये घरकुल पुर्ण होत नसल्याने वाढीव तरतुद उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी केलेली आहे.मात्र मंजुर निधी पेक्षा जास्त निधी देण्याची तरतुद नसल्याचे सदस्य सचिवानी सागीतले या वर मा.अध्यक्ष यांनी संबधीत प्रकरण मा.आयुक्त समाज कल्याण यांच्या कडे पाठवुन मार्गदर्शन घेण्यात यावे असे सुचित केले

१०. कोर्टात प्रलंबीत प्रकरणाच्या आढावा घेताला असता सरकारी वकीलाच्या प्रतिनिधी नी त्यांनी अत्याचार ग्रस्तासाठी नविन कोर्ट सुरु झालेले असुन सर्व प्रकरणे लवकरच निकाली निघतील असे सांगीतले .

//३//

११. अत्याचारग्रस्तांना जमिन मंजुर करुन वाटप करण्याचा मुद्दा अशासकीय सदस्यायांनी माडला असता सदस्य सचिव यांनी सदरील व्यक्तीना दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेतुन लाभ देता येईल असे सांगीतले मात्र अशासकीय सदस्यांनी या योजने वेतीरिक्त जमिन वाटपाची तरतुद आहे असे सांगीतले असता मा.अध्यक्ष यांनी सदर बाबीवर मा.आयुक्त समाज कल्याण यांच्या कडुन मागर्दशन मागविण्यात यावे असे सुचित केले.

शेवटी सर्वाचे आभार मानुन मा.अध्यक्षाच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सदस्य सचिव,
जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती,
तथा सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण, औरंगाबाद

अध्यक्ष,
जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती
तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

जा.क्र.सहाआयुसकऔ/नाहसं/बैठक/इतिवृत्त/ ५/१४-१५
कार्यालय, १४१२
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, औरंगाबाद
दिनांक ०५/०६/२०१४

**प्रत : सदर इतिवृत्त माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सविनय सादर.**

१) मा.पोलीस आयुक्त(शहर) औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) पोलीस अधिक्षक (ग्रामीण ) औरंगाबाद.
३) पोलीस उपअधिक्षक, (नाहसं) औरंगाबाद.
४) सरकारी वकील, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद.
५) जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद.
६) मा.श्री.शरद महादु जाधव, अशासकीय सदस्य, रा.मथुरानगर, सिडको, औबाद
७) मा.श्री.अप्पासाहेब भोंडे, अशासकीय सदस्य रा.वडवाडी ता.पैठण
८) मा.श्री.राजू थोरात, अशासकीय सदस्य रा.औरंगाबाद
९) मा.श्री.विजय वाहुळ, अशासकीय सदस्य रा.औरंगाबाद

सदस्य सचिव
जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती तथा
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,औरंगाबाद.